# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 02 January 2026

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०२ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

सातारा इथं ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं औपचारिक उद्घाटन आज ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉक्टर मृदुला गर्ग यांच्या हस्ते झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ज्येष्ठ साहित्यिक, मागच्या वर्षीच्या संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील, संमेलनाचे स्वागताध्यक्ष मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी यावेळी उपस्थित होते.

उद्घाटक डॉक्टर मृदुला गर्ग यांनी यावेळी बोलताना, मराठी आणि हिंदी साहित्यात असलेल्या साम्याविषयी माहिती दिली.

गावागावातली ग्रंथालयं समृद्ध झाली पाहिजे, असं मत महामंडळाचे अध्यक्ष जोशी यांनी यावेळी व्यक्त केलं. शाळांमध्ये मराठी वगळता इतर भाषा सक्तीची करण्यावर महामंडळाचा विरोध असल्याचंही त्यांनी सांगितलं. आपल्यातली मराठीपणाची ज्योत तेवत ठेवणं महत्वाचं असून, तसं झालं तर भाषा आणि संस्कृतिची काळजी करण्याची गरज उरणार नाही, असं ते म्हणाले.

दरम्यान, या संमेलनात आज कविसंमेलन, बाल–कुमार वचाकांशी संवाद, परिसंवाद आणि ‘शिकायला गेलो एक’ या नाटकाचं सादरीकरण होणार आहे.

****

मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या कामात बोगदा क्रमांक पाचचं काम पूर्ण झाल्याची माहिती, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. पालघर इथं आज झालेल्या हाय-स्पीड टनेल ब्रेकथ्रू कार्यक्रमात वैष्णव दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. त्यावेळी त्यांनी या प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. या

प्रकल्पात सात बोगदे आणि एक समुद्राखालच्या बोगद्याचा समावेश असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. ते म्हणाले –

**बाईट – रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव**

मुंबई – अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या पहिल्या टप्प्याचं लोकार्पण १५ ऑगस्ट २०२७ रोजी होणार असल्याची माहिती रेल्वेमंत्र्यांनी काल दिली होती.

****

राज्यातल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आज दुपारी तीन वाजता संपणार आहे. उद्या निवडणूक चिन्हाचं वाटप झाल्यानंतर अंतिम उमेदवार यादी जाहीर होईल. येत्या १५ जानेवारीला मतदान तर १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे.

दरम्यान, काही ठिकाणचे अर्ज बाद झाल्यानं काही उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. मालेगाव महानगरपालिकेत प्रभाग सहा मध्ये प्रतिस्पर्धी पक्षांचे उमेदवारी अर्ज बाद झाल्याने इस्लाम पार्टीच्या उमेदवार मुनीरा शेख या बिनविरोध निवडून आल्या. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत शिवसेनेचे तीन आणि भाजपाचा एक उमेदवार बिनविरोध निवडून येणार हे स्पष्ट झालं आहे. त्यामुळे या महानगरपालिकेत बिनविरोध निवडून येणाऱ्या उमेदवारांची संख्या आता आठ झाली आहे.

जळगाव महानगरपालिकेतल्या प्रतिस्पर्धी उमेदवारांचे अर्ज बाद ठरल्याने प्रभाग क्रमांक १२ ब मधल्या भाजप उमेदवार उज्ज्वला बेंडाळे यांचा बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे.

धुळे महानगरपालिकेत प्रभाग क्रमांक १७ ब मध्ये दोन अपक्ष उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने भाजपच्या उमेदवार सुरेखा उगले यांची बिनविरोध निवड निश्चित आहे. याआधीच दोन उमेदवार बिनविरोध निवडले गेल्यामुळे धुळ्यातून भाजपच्या तीन उमेदवारांची बिनविरोध निवड होत आहे.

****

पणन हंगाम २०२५–२६ अंतर्गत किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान आणि भरडधान्य खरेदीसाठी शेतकऱ्यांच्या ऑनलाईन नोंदणीला येत्या ३१ जानेवारी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण

विभागानं ही माहिती दिली. यापूर्वी शेतकरी नोंदणीची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ होती.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातले शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी राज्यातल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीपोटी मदत म्हणून आपलं एक दिवसाचं वेतन दिलं आहे. विद्यापीठाच्या वतीने मुख्यमंत्री सहायता निधीत १६ लाख ५९ हजार रुपये जमा करण्यात आले. कुलगुरुंसह सर्व अधिकारी, शिक्षक, कर्मचारी अशा एकूण ४३५ जणांनी हे योगदान दिलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या गंगापूर तालुक्यातल्या लासूर इथं काल शब्द सह्याद्री साहित्य प्रतिष्ठानच्या वतीने शब्दोत्सव काव्यसंमेलन घेण्यात आलं. मराठवाड्याच्या विविध भागातल्या कविंनी आपल्या कविता यावेळी सादर केल्या. कवी गणेश आघाव, आत्माराम जाधव, महारुद्र पोपडे, सारिका माकोडे, वैष्णवी मनाळ आदी कविंनी आपलं सादरीकरण करत, मैफिल रंगवली.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयाच्या वतीने भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत संधी उपलब्ध करण्यात आली आहे. हे प्रशिक्षण नाशिक इथं होणार असून, यात विद्यार्थांना नि:शुल्क प्रशिक्षण आणि निवास उपलब्ध असेल.

****